




# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे





* कराड (जि.सातारा) * वर्ष - २ रे. * अंक ८ वा. * शुक्रवार दि.१० जुलै २०२६ * पृष्ठे ४ * किंमत : १ रुपये * RNI NO : MAHMAR/2024/86610

* Karad (Dis.Satara) * Vol - 2 * Ishue - 8 * Friday 10 July 2026 * Page - 4 * Price - 1 Rs. * RNI NO : MAHMAR/2024/86610


## 'सी.एम.श्री' योजनेत कराड तालुक्यातील शाळांचा समावेश होणार

### आ.डॉ.अतुलबाबा भोसले यांच्या मागणीला यश; मंत्री ना.पंकज भोयर यांची ग्वाही

कराड : राज्यातील शासकीय शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'सी.एम. श्री' योजनेत कराड तालुक्यातील शाळांचा प्राधान्याने समावेश करण्यात येईल, अशी ग्वाही शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधानसभेत दिली. कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी अधिवेशनात लक्षवेधीद्वारे हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करत, कराड तालुक्याचा प्राधान्याने विचार करण्याची जोरदार मागणी केली होती.







'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने देशभरात 'पी.एम. श्री' शाळा विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही राज्य सरकारने 'सी.एम. श्री' योजना राबविण्याचा निर्णय घेतला असून, राज्यातील शासकीय शाळांना आधुनिक सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांगीण विकासाची संधी उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे.

याच पार्श्वभूमीवर कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी विधानसभेत लक्षवेधी उपस्थित करत सांगितले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'पी.एम. श्री' शाळा सुरू करण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात 'सी.एम. श्री' शाळा उभारण्याची योजना पुढे येत आहे.

या योजनेत कराड तालुक्यातील शाळांचा प्राधान्याने समावेश करावा.

यावर उत्तर देताना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले की, 'पी.एम. श्री' योजनेच्या माध्यमातून केंद्र सरकारने देशातील निवडक शासकीय शाळांचा दर्जा उंचावण्याचे काम केले आहे.

त्याच धर्तीवर महाराष्ट्रात 'सी.एम. श्री' शाळा योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेसाठी राज्यातील सुमारे ४,८०० शासकीय शाळांची निवड करण्यात आली असून, त्यासंदर्भातील प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. वित्त विभागाची मान्यता मिळाल्यानंतर राज्यभरात 'सी.एम. श्री' शाळांच्या विकासाला तातडीने सुरुवात केली जाईल.


आ. डॉ. अतुलबाबा भोसले यांनी कराड दक्षिण मतदारसंघातील शाळांचा या योजनेत समावेश करण्याची केलेली मागणी सकारात्मक असल्याचे नमूद करत, मंत्री ना. भोयर म्हणाले की, कराड तालुक्यासह सातारा जिल्ह्यातील शाळांचाही 'सी.एम. श्री' योजनेत समावेश करण्यात येईल.

राज्यमंत्र्यांनी विधानसभेत केलेल्या या घोषणेमुळे आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या मागणीला यश आले असून, कराड तालुक्यातील विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा, तंत्रज्ञानाधारित शिक्षण, दर्जेदार पायाभूत सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

## शिवकालीन वारसा पर्यटनाला मिळणार नवी ओळख

### किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी वीरजीवाजी महाले यांचे भव्य स्मारक उभारणार; प्रथम टप्प्यात १ कोटींचा निधी-पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्णयातून किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी वीर जीवाजी महाले यांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असून, या प्रकल्पासाठी प्रथम टप्प्यात एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासंदर्भातील निवेदन पर्यटन मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी आज विधानसभेत सादर केले.



मंत्री श्री. देसाई यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अलीकडील महाबळेश्वर दौऱ्यादरम्यान विविध शिवप्रेमी संघटनांनी वीरजीवाजी महाले यांचे स्मारक उभारण्याची मागणी केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून पर्यटन विभागामार्फत प्रतापगडाच्या पायथ्याशी भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मंत्री श्री. देसाई म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य हे शौर्य, स्वाभिमान आणि त्यागाचे प्रतीक आहे. प्रतापगडाच्या ऐतिहासिक लढाईत वीर जीवाजी महाले यांनी समयसूचकता, धाडस आणि पराक्रमाचे दर्शन घडवत छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राण वाचवले. होता जीवा म्हणून वाचला शिवा ही इतिहासात अजरामर झालेली उक्ती त्यांच्या अतुलनीय शौर्याची साक्ष देणारी आहे.

किल्ले प्रतापगडावर दरवर्षी १० नोव्हेंबर रोजी शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सोहळ्यासाठी लाखो शिवप्रेमी, इतिहास अभ्यासक, विद्यार्थी तसेच देश-विदेशातील पर्यटक प्रतापगडाला भेट देतात. त्यामुळे प्रतापगडाचे ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व सातत्याने वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

वीर जीवाजी महाले यांचे स्मारक उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून विविध सामाजिक संस्था, इतिहास संशोधक, शिवप्रेमी संघटना आणि लोकप्रतिनिधींकडून होत होती. शासनाने या मागणीची दखल घेत पर्यटन विभागाच्या जागेवर भव्य व आकर्षक स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

## आठवडाभरानंतर कराड तालुक्यात सूर्याचे दर्शन

कराड(प्रतिनिधी): गेल्या आठवडाभरापासून कराड, मलकापूर शहरासह संपूर्ण तालुक्यावर अक्षरशः धुमाकूळ घालणाऱ्या मुसळधार पावसाने गुरुवारी अखेर विश्रांती घेतली. सलग अनेक दिवसांच्या संततधारेनंतर सकाळपासून पावसाने उघडीप दिल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. विशेष म्हणजे, जवळपास आठवडाभरानंतर सूर्याचे दर्शन झाल्याने वातावरणातही काहीसा बदल जाणवला. पावसाच्या विश्रांतीमुळे जनजीवन पूर्वपदावर येऊ लागले असून, शेतकऱ्यांनीही शेतीकामांना पुन्हा वेग दिला आहे.

शहरातील अनेक रस्त्यांवर पाणी साचले होते. नागरिक, व्यापारी आणि वाहनधारकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागले. मात्र गुरुवारी सकाळी पावसाचा जोर पूर्णपणे ओसरल्याने दैनंदिन व्यवहार सुरळीत होण्यास मदत झाली. सततच्या पावसामुळे कृष्णा आणि कोयना नदीच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली होती. कराड येथील प्रीतिसंगम परिसरातही पाण्याची पातळी वाढून बुधवारी सायंकाळी कृष्णा घाटाच्या पायऱ्यांपर्यंत पाणी पोहोचले होते. त्यामुळे आणखी दोन दिवस मुसळधार पाऊस कायम राहिला असता तर, कराड शहरासमोर पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र गुरुवारी पावसाने विश्रांती घेतल्याने नदीची पाणीपातळी स्थिर राहिली असून, नागरिकांनीही सुटकेचा निश्वास सोडला आहे. दरम्यान, कोयना धरणातील पाणीसाठा सुमारे ४५ टीएमसीपर्यंत पोहोचला आहे.

आठवडाभर झालेल्या पावसामुळे पुणे-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील सेवा रस्त्यांची मोठी दुरवस्था झाली आहे. कोल्हापूर नाका, पाचवड फाटा, आटके टप्पा, वाठार, मालखेड फाटा आदी परिसरातील सेवा रस्त्यांवर ठिकठिकाणी पाणी साचल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नसल्यामुळे वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस पावसाची उघडीप राहण्याचा अंदाज वर्तविला असला, तरी प्रशासनाने संभाव्य पूरस्थितीबाबतची सतर्कता कायम ठेवली आहे. कराडमध्ये दाखल झालेले एनडीआरएफचे पथक नदीकाठच्या गावांमध्ये नागरिकांना पूरपूर्व तयारी आणि बचावाचे प्रशिक्षण देत आहे.

### तात्पुरत्या निवारा व्यवस्थेची पाहणी

**कराड नगरपालिकेने नदीकाठच्या संभाव्य बाधित भागातील नागरिकांच्या सुरक्षित स्थलांतरासाठी आवश्यक नियोजन पूर्ण केले आहे. शाळा क्रमांक ३ सह विविध ठिकाणी तात्पुरत्या निवारा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, तसेच पालिकेच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणांची पाहणी करून आवश्यक तयारीचा आढावा घेतला आहे.**

## पोवई नाका ते बॉम्बे रेस्टॉरंट चौक वाहतुक मार्गात बदल

सातारा : सातारा शहर नगरपरिषद हद्दीतील पोवई नाका ते बॉम्बे रेस्टॉरंट चौक जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाचे काम ठेकेदारामार्फत चालू आहे. या रस्त्यावरून दररोज रा.प. महामंडळाच्या एस.टी बसेस, इतर सर्व प्रकारची अवजड वाहने त्याचप्रमाणे दुचाकी, चारचाकी वाहने येजा करीत असतात.

सदर रस्त्याच्या दुभाजका पलीकडील एकच मार्गिका वाहतुकीसाठी उपलब्ध आहे. त्यामुळे एकाच मार्गिकेतून वाहनांची ये-जा असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. त्या अनुषंगाने रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत पोवई नाका ते बॉम्बे रेस्टॉरंट चौक व बॉम्बे रेस्टॉरंट चौक ते पोवई नाका जाणाऱ्या रस्त्यावरची वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे. यासाठी दि. १० जुलै २०२६ रोजीचे मध्यरात्रीपासून ते दि.३० सप्टेंबर २०२६ रोजीचे २३.५९ वा पर्यंत खालीलप्रमाणे वाहतुकीत बदल करीत असल्याचे पोलीस अधीक्षक निखील पिंगळे यांनी कळविले आहे.

वाहतुकीकरीता पर्यायी मार्ग पुढीलप्रमाणे. सातारा मध्यवती बसस्थानका मधुन राज्य परिवहन महामंडळाच्या मुंबई, पुणे, कोरेगांव, सोलापुर बाजुकडे जाणा-या सर्व एस टी बसेस तसेच अवजड वाहने ट्रक, डंपर, कंटेनर, ट्रॅक्टर इतर मालवाहतुक करणारी वाहने ही जुनी जिल्हा मध्यवती बँक, पोलीस परेड मैदान, पारंगे चौक जुना.आर.टी.ओ चौक वाढे फाटा या मार्ग सातारा शहरातुन बाहेर पडतील.

## महाबळेश्वर तालुक्यातील देवसरे येथे डोंगराचा भाग कोसळला

### पाणीपुरवठा पाइपलाइनचे नुकसान, नागरी वस्ती सुरक्षित


महाबळेश्वर : सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर परिसरात गुरुवारी दिवसभर वादळी वाऱ्यांसह दाट धुके पसरले असून पावसाच्या तीव्रतेत काहीशी घट झाल्याचे चित्र आहे. मात्र, वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता लक्षात घेता झाडे उन्मळून पडणे अथवा फांद्या तुटून पडण्याचा धोका कायम असल्याने नागरिकांनी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, घोट येथून बोर्गेवाडीकडे जाणाऱ्या घाटरस्त्यावरील एका ठिकाणी मुसळधार पावसामुळे वाहून आलेल्या पाण्याने रस्त्याचा काही भाग खचला आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला असून वाहनचालकांनी अत्यंत सावधगिरीने प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित विभागाकडून रस्त्याची पाहणी करून



दुरुस्तीची कार्यवाही सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

याचवेळी महाबळेश्वर तालुक्यातील देवसरे गावाच्या वरच्या डोंगरभागात भूस्खलनाची घटना घडली. डोंगराचा काही भाग कोसळल्याने गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाइनचे नुकसान झाले असून त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संबंधित यंत्रणेकडून नुकसानग्रस्त पाइपलाइनची दुरुस्ती करण्यासाठी तातडीने उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.



सुदैवाने या भूस्खलनामुळे देवसरे गावातील नागरी वस्तीला कोणताही धोका निर्माण झालेला नसून जीवित किंवा वित्तहानी झाल्याची नोंद नाही. तरीही परिसरातील परिस्थितीवर प्रशासनाकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, डोंगर उतारालगत राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामानातील बदलत्या परिस्थितीमुळे पुढील काही तास वादळी वाऱ्यांचा वेग वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे उंच झाडांखाली थांबणे टाळावे, अनावश्यक प्रवास करू नये आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जयवंत शुगर्समध्ये मिल रोलर पूजन उत्साहात




कराड : धावरवाडी (ता. कराड) येथील जयवंत शुगर्स साखर कारखान्यात येत्या गळीत हंगामासाठी श्री. विनायक भोसले यांच्या हस्ते मिल रोलरचे पूजन उत्साहात करण्यात आले. याप्रसंगी 'जयवंत शुगर्स'चे प्रेसिडेंट सी. एन. देशपांडे, सरव्यवस्थापक एन. एम. बंडगर, सरव्यवस्थापक (टेक्निकल) ए. बी. खटके आदी मान्यवर उपस्थित होते.

धार्मिक विधी झाल्यानंतर श्री. विनायक भोसले यांच्या हस्ते यांत्रिक कळ दाबून रोलर बसविण्याच्या कामास प्रारंभ करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे ओ.एस.डी. दादासाहेब मोहिते, वसंतराव पवार, आनंदा पाटील, एम. के. कापूरकर, नाना शेळके, 'जयवंत शुगर्स'चे वर्क्स मॅनेजर एच. एम. नदाफ, प्रॉडक्शन मॅनेजर बी. जी. चव्हाणके, केन मॅनेजर नाथाजी कदम, मुख्य प्रशासकीय अधिकारी आर. टी. शिरसाट, डिस्टीलरी मॅनेजर व्ही. जी. म्हसवडे, पर्चेस ऑफिसर पी. एस. जाधव, ईडीपी मॅनेजर ए. एल. काशीद, मटेरियल मॅनेजर जी. एस. बाशिंगे, सी.एच.आर. मॅनेजर व्ही. पी. जोशी, डेप्यु. चिफ अकौंटंट दिलीप पेन्टेवार, सुरक्षा अधिकारी व्ही. टी. भोसले यांच्यासह कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नगरपालिका हद्दीतही रोजगार हमी योजना लागू करा

### आमदार मनोज घोरपडे यांची राज्य सरकारकडे मागणी; मंत्री भरत गोगावले यांचे सकारात्मक संकेत

कराड (प्रतिनिधी): ग्रामीण भागापुरती मर्यादित असलेली रोजगार हमी योजना आता नगरपालिका आणि निमशहरी भागातही राबविण्यात यावी, अशी ठोस मागणी कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे यांनी राज्य सरकारकडे केली आहे. 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शहरी भागातील बेरोजगार आणि स्थलांतरित मजुरांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विधान भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या 'रोजगार हमी, विकसित भारत रोजगार व आजीविका मिशन' या राज्यस्तरीय कार्यशाळेत आमदार घोरपडे यांनी हा मुद्दा उपस्थित केला. या कार्यशाळेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, केंद्रीय ग्रामीण विकास विभागाच्या संयुक्त सचिव रोहिणी भाजीभाकरे, राज्यातील विविध मतदारसंघांचे आमदार, तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.




यावेळी बोलताना आमदार घोरपडे म्हणाले, रोजगार हमी योजनेमुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. मात्र, नगरपालिका क्षेत्रातही रस्त्यांची देखभाल, नालेसफाई, वृक्षारोपण, तलावांचे खोलीकरण, सार्वजनिक स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाची अनेक कामे या योजनेतून करता येऊ शकतात. त्यामुळे स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीला चालना मिळण्याबरोबरच शहरांच्या विकासालाही गती मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

नगरपालिका क्षेत्रात वाढती बेरोजगारी आणि स्थलांतरित मजुरांची समस्या गंभीर बनत असल्याचे सांगत, या घटकांनाही रोजगार हमी योजनेचा लाभ मिळणे ही काळाची गरज असल्याचे घोरपडे यांनी अधोरेखित केले. विकसित भारताचे स्वप्न साकार करायचे असेल, तर ग्रामीण आणि शहरी भागातील विकासातील दरी कमी करण्यासाठी या योजनेची व्याप्ती वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिले. दरम्यान, आमदार घोरपडे यांनी मांडलेल्या प्रस्तावाची रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले आणि उपस्थित केंद्रीय अधिकाऱ्यांनी सकारात्मक दखल घेतली. नगरपालिका व निमशहरी भागात रोजगार हमी योजना विस्तारण्याबाबत शासनस्तरावर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन यावेळी देण्यात आले.

# संपादकीय....

## संवादाचे महत्त्व

लोकशाही व्यवस्थेत मतभेद असणे स्वाभाविक असते; मात्र त्या मतभेदांवर संवादातून मार्ग काढणे आणि जनतेच्या प्रश्नांप्रती संवेदनशीलता दाखविणे हे लोकप्रतिनिधींचे मूलभूत कर्तव्य आहे. दिल्लीतील जंतरमंतर येथे उपोषणाला बसलेल्या पर्यावरणवादी व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दूरध्वनीवरून विचारपूस केली, तसेच त्यांच्या सूचनेनुसार पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी जंतरमंतरवर जाऊन वांगचुक यांची प्रत्यक्ष भेट घेतली. या घटनेकडे केवळ राजकीय भेट म्हणून नव्हे, तर लोकशाहीतील संवाद आणि सहवेदनेचे प्रतीक म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. सोनम वांगचुक हे लडाखमधील पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि स्थानिकांच्या घटनात्मक हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवत आहेत. हिमालयीन प्रदेशातील पर्यावरणीय समतोल, हवामान बदलाचे वाढते परिणाम आणि स्थानिक नागरिकांच्या अपेक्षा या विषयांवर त्यांनी देशाचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या आंदोलनामागे केवळ प्रादेशिक मागण्या नसून पर्यावरण संरक्षण आणि लोकसहभागातून विकास या व्यापक संकल्पना आहेत.अशा परिस्थितीत उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करणे आणि त्यांच्या मागण्या जाणून घेण्याचा प्रयत्न करणे ही लोकशाही संस्कृतीची सकारात्मक बाजू मानावी लागेल. आंदोलन हे लोकशाहीतील वैध माध्यम असले तरी त्यामागील प्रश्नांवर सरकार, विरोधी पक्ष आणि समाजातील विविध घटकांनी संवेदनशीलतेने विचार करणे तितकेच आवश्यक आहे. राजकीय मतभेद असले तरी जनहिताच्या प्रश्नांवर संवादाचे दरवाजे खुले राहिले पाहिजेत.आज देशासमोर पर्यावरणीय आव्हाने अधिक गंभीर होत आहेत. हिमालयीन प्रदेशातील बदलते हवामान, अतिवृष्टी, भूस्खलन, जलस्त्रोतांवरील वाढता ताण आणि अनियंत्रित विकास यांचा परिणाम केवळ लडाखपुरता मर्यादित नाही. त्याचे पडसाद संपूर्ण देशावर उमटत आहेत. त्यामुळे पर्यावरणाशी संबंधित आंदोलनांकडे केवळ राजकीय चष्म्यातून न पाहता राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने त्यांचा विचार होणे आवश्यक आहे.उद्धव ठाकरे यांनी प्रकृतीची विचारपूस करणे आणि खासदार अरविंद सावंत यांनी प्रत्यक्ष भेट देणे हा संवादाचा एक प्रयत्न मानला जाऊ शकतो. मात्र अशा भेटींपलीकडे जाऊन आंदोलनामागील प्रश्नांवर ठोस चर्चा, सकारात्मक मध्यस्थी आणि शाश्वत उपाययोजना घडणे अधिक महत्त्वाचे आहे. लोकशाहीची खरी ताकद ही विरोधी मतांचा आदर, संवादाची तयारी आणि जनभावनांचा सन्मान यातच असते.पर्यावरण, स्थानिक हक्क आणि शाश्वत विकास यांसारखे विषय कोणत्याही एका पक्षापुरते मर्यादित नाहीत. ते संपूर्ण देशाच्या भविष्याशी संबंधित आहेत. त्यामुळे आंदोलनकर्त्यांच्या भावना समजून घेत त्यांच्या मागण्यांचा घटनात्मक आणि लोकशाही मार्गाने विचार करणे ही सर्व संबंधित यंत्रणांची सामूहिक जबाबदारी आहे. संवादातून तोडगा काढण्याची परंपरा अधिक मजबूत झाली, तर ती भारतीय लोकशाहीच्या परिपक्वतेचे द्योतक ठरेल.

## एस.टी.आगाराच्या व्यवस्थापक पदी रेश्मा गाडेकर रुजू



सातारा : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सातारा विभागातील वाई आगाराच्या व्यवस्थापक पदी रेश्मा गाडेकर यांची नियुक्ती झाली आहे. महामंडळाच्या सेवेत रुजू झालेल्या गाडेकर यांनी खात्याअंतर्गत परीक्षेत उत्तीर्ण होऊन ते विभागीय वाहतूक अधिकारी यामध्ये कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून पोहचलेल्या आहेत. रेशमा गाडेकर यांची नुकतीच वाई आगाराच्या आगार व्यवस्थापक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांचा यापूर्वीचा सातारा आगारातील उत्कृष्ट काम करण्याचा अनुभव आहे.एसटी महामंडळाच्या मूलभूत कर्मचारी वर्गांची अडचण व आवश्यक असणाऱ्या प्रश्नांची जान त्यांना आहे. पदोन्नतीबद्दल त्यांना अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पाणीपुरवठा योजनांना अखंड वीजपुरवठा करावा : आ.सत्यजित देशमुख

शिराळा : ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा योजनांना अखंड वीजपुरवठा मिळावा तसेच गावालगतच्या छोट्या वाड्या-वस्त्यांना कृषी फिडरऐवजी गावठाण फिडरमधून २४ तास वीज द्यावी, अशी ठाम मागणी आमदार सत्यजित देशमुख यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे केली.



देशमुख म्हणाले, वारंवार होणाऱ्या वीजखंडितीमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत असून हजारो नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा योजनांसाठी स्वतंत्र वीजपुरवठा, सौरऊर्जा प्रकल्पांना गती, नेट मीटरिंगमधील अडथळे दूर करणे आणि महावितरणची परवानगी प्रक्रिया सुलभ करण्याची त्यांनी मागणी केली. तसेच गावालगतच्या छोट्या वस्त्यांना गावठाण फिडरमधून २४ तास वीज दिल्यास घरगुती वीज, पाणीपुरवठा, विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि दैनंदिन जीवन अधिक सुलभ होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी उत्तरात सांगितले की, राज्यात ग्रामीण विकास विभागाकडे ६२,७२५ पाणीपुरवठा वीजजोडण्या असून त्यापैकी ५८,५९९ जोडण्यांची २,६४८ कोटी रुपयांची थकबाकी आहे. २०२४-२५ मध्ये शासनाने वीजबिलासाठी १,१३६ कोटी रुपये महावितरणला दिले असून सर्व योजनांचा समावेश कंपोझिट बिलिंग प्रणालीत करण्यात आला आहे. ६ जुलै २०२६ पर्यंत १,०९८ सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांवर ४५.८९ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत प्रस्तावित ४,४५७ कृषी फिडरपैकी ३,२२३ फिडरचे काम पूर्ण झाले असून १,२३४ फिडरचे काम सुरू असल्याची माहितीही त्यांनी सभागृहात दिली.

## बांबूवर आधारित जैवइंधन हे भारताच्या हरित भविष्याची दिशा : पाशा पटेल



नवी दिल्ली : महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री पर्यावरण संतुलित विकास कार्यबलाचे कार्यकारी अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांना नवी दिल्ली येथे आयोजित १७ व्या ॲग्रिकल्चर लीडरशिप कॉन्क्लेव्ह-२०२६ मध्ये प्रतिष्ठेचा 'ॲग्रिकल्चर लीडरशिप अवॉर्ड' प्रदान करण्यात आला.

हा राष्ट्रीय स्तरावरील कॉन्क्लेव्ह ॲग्रिकल्चर टुडे समूहाने, केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या सहकार्याने आयोजित केला होता. या परिषदेला देश-विदेशातील धोरणकर्ते, कृषी तज्ज्ञ, संशोधक, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाशा पटेल म्हणाले की, बांबूवर आधारित जैवइंधन निर्मिती ही भारताच्या हरित, स्वावलंबी आणि शाश्वत भविष्याची प्रभावी दिशा ठरू शकते. बांबू हे जलद वाढणारे, पर्यावरणपूरक पीक असून त्याला तुलनेने कमी पाणी आणि कमी कृषी निविष्ठांची आवश्यकता असते. बांबूपासून विविध प्रकारचे जैवइंधन तयार करता येते. त्यामुळे जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होण्याबरोबरच शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा नवा आणि शाश्वत स्रोत उपलब्ध होईल.

या कॉन्क्लेव्हला केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योगमंत्री चिराग पासवान, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह, भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती पी. सदाशिवम, उत्तर प्रदेशचे कृषिमंत्री सूर्यप्रताप शाही, ॲग्रिकल्चर टुडे समूहाचे संस्थापक डॉ. एम. जे. खान उपस्थित होते. यापूर्वी केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, ज्येष्ठ नेते शरद पवार, हरितक्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामिनाथन आणि श्वेतक्रांतीचे शिल्पकार डॉ. वर्गीस कुरियन यांसारख्या मान्यवरांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. पाशा पटेल यांना मिळालेला हा राष्ट्रीय सन्मान महाराष्ट्राच्या कृषी आणि पर्यावरण क्षेत्रासाठी अभिमानाची बाब असून शाश्वत शेती, स्वच्छ ऊर्जा आणि हवामान बदलास सक्षम ग्रामीण विकासाच्या दिशेने होत असलेल्या प्रयत्नांना राष्ट्रीय स्तरावर मिळालेली ही महत्त्वपूर्ण दखल मानली जात आहे.

## अंध महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाची कामगिरी अभिमानास्पद : राज्यपाल जिष्णु देव वर्मा




राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज भारताच्या अंध महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाच्या निवडक सदस्यांसह 'देख ले! इंडिया' हा माहितीपट लोकभवन मुंबई येथे पाहिला व संघाला तसेच खेळाडूंना कौतुकाची थाप दिली. युनिसेफ महाराष्ट्र तर्फे 'देख ले ! इंडिया' या माहितीपटाचे प्रदर्शन पाहिल्यानंतर राज्यपाल खेळाडू, युनिसेफचे अधिकारी व माहितीपटाच्या निर्मात्यांशी बोलत होते. माहितीपटात भारताच्या महिला दृष्टिहीन क्रिकेट संघाचा प्रेरणादायी प्रवास दाखवण्यात आला आहे.


दृष्टिहीन खेळाडूंना सहानुभूती नको तर संधी हवी असते असे सांगून अंधांच्या महिला क्रिकेट संघाची वाटचाल तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील विजय दाखवणारा माहितीपट प्रेरणादायी असल्याचे राज्यपालांनी सांगितले. या माहितीपटाचा आणखी एक प्रयोग लोकभवन येथे आयोजित करून विविध क्षेत्रातील मान्यवरांना तो पाहण्यास निमंत्रित करण्यात येईल, असे राज्यपालांनी सांगितले. या माहितीपटातून व खेळाडूंच्या जीवनातून अनेकांना प्रेरणा मिळेल असे राज्यपालांनी सांगितले.

माहितीपट निर्माते मुकुंद मूर्ती यांनी सांगितले की, या माहितीपटातून अंध महिला क्रिकेटपटू विशेष आवाज करणाऱ्या चेंडूच्या साहाय्याने क्रिकेट कसे खेळतात, याची माहिती समाजाला मिळते. या संघातील खेळाडू अतिशय प्रतिकूल सामाजिक व आर्थिक परिस्थितीतून पुढे आल्या आहेत. भारतीय अंध महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाच्या उपकर्णधार गंगा कदम यांनी आपल्या अनुभवांना उजाळा दिला. क्रिकेटमुळे माझे आयुष्य बदलले. या खेळामुळे मला आत्मविश्वास, आयुष्याला दिशा आणि देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. यावेळी संघातील खेळाडू प्रिया खीर आणि सुषमा पटेल उपस्थित होत्या.

क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाचे अध्यक्ष तसेच समर्थनम ट्रस्ट फॉर द डिसेबल्डचे संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. महांतेश जी. किवडसन्नावर यांनी दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींसाठी क्रिकेटने उभ्या केलेल्या नव्या संधींचा आढावा घेतला. ७० मिनिटांच्या या माहितीपटात भारतातील विविध भागांतून आलेल्या अंध महिला क्रिकेटपटूंचा इंग्लंडमध्ये झालेल्या वर्ल्ड ब्लाइंड गेम्सपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास उलगडण्यात आला आहे. दृष्टिदोष असलेल्या तरुण-तरुणींमधील जिद्द, सर्वसमावेशकता आणि समान संधींचे महत्त्व या माहितीपटातून अधोरेखित करण्यात आले आहे. यावेळी युनिसेफ महाराष्ट्राचे क्षेत्रीय अधिकारी संजय सिंह, युनिसेफच्या कम्युनिकेशन स्पेशालिस्ट स्वाती महापात्रा, खेळाडू प्रिया खीर व सुषमा पटेल, तसेच संघाच्या व्यवस्थापक शिखा शेट्टी उपस्थित होत्या.

## उभी असलेल्या हजारो झाडांचे भविष्यही जपूया

दरवर्षी पावसाळ्यात राज्यभरात वादळी वारे, मुसळधार पाऊस आणि अतिवृष्टीमुळे झाडे कोसळल्याच्या घटना घडतात. या घटनांमुळे जीवितहानी, मालमत्तेचे नुकसान, वाहतुकीत अडथळे आणि वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडतात. प्रसारमाध्यमे या घटनांचे वृत्तांकन करतात, प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना केल्या जातात आणि काही दिवस या विषयावर चर्चा रंगते.




पर्यावरण संवर्धनाचा विचार केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित न राहता विद्यमान वृक्षांचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन, त्यांच्या आरोग्याची तपासणी आणि नागरिकांचा सहभाग यांवर आधारित असणे आवश्यक आहे. शहरीकरण, रस्त्यांचे रुंदीकरण, भूमिगत कामे, मुळांभोवती होणारे अतिक्रमण, मातीची घटती गुणवत्ता आणि हवामानातील बदल यांचा परिणाम शहरांतील वृक्षांवर होत आहे.

याच पार्श्वभूमीवर तशीरलखपवळर या संस्थेने 'Urban Forest Intelligence' या अभिनव नागरिक सहभाग उपक्रमाची घोषणा केली आहे. या पथदर्शी अभ्यासामध्ये १०० शहरी वृक्षांचा अभ्यास करण्यात येणार असून, त्यापैकी अलीकडेच कोसळलेल्या २० झाडांची प्रत्यक्ष पाहणी, छायाचित्रांचे विश्लेषण, स्थानिक इतिहास, ज्येष्ठ नागरिकांच्या आठवणी, परिसरातील बदल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या साहाय्याने शास्त्रीय नोंदी तयार करण्यात येणार आहेत.

नागरिक विज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांची सांगड घालणारा हा उपक्रम शहरी वृक्षसंवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. स्थानिक नागरिक, विद्यार्थी, पर्यावरण अभ्यासक, ज्येष्ठ नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे काम केल्यास शहरांतील वृक्षांचे आरोग्य, धोके आणि संरक्षणाची गरज याविषयी विश्वासार्ह माहिती उपलब्ध होऊ शकते.

या संपूर्ण प्रक्रियेत प्रसारमाध्यमांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. वृत्तांकन हे केवळ घटना सांगण्यापुरते मर्यादित न राहता पर्यावरणीय जबाबदारी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नागरिक सहभाग यांना प्रोत्साहन देणारे असावे. या उपक्रमासाठी शासन, महानगरपालिका, वन विभाग, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था, उद्योग समूह, कॉर्पोरेट सामाजिक दायित्व विभाग, पर्यावरण संस्था आणि जबाबदार नागरिक यांनीही पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पर्यावरणाचे संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती समाजाची सामूहिक बांधिलकी आहे. प्रत्येक पडलेले झाड हा केवळ अपघात नसून भविष्यातील हजारो झाडांचे संरक्षण करण्याची संधी आहे.

- **विजयकुमार कट्टी,** ट्री मॅन ऑफ ठाणे

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार भारताच्या निर्मितीसाठी प्रेरणादायी - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

मुंबई : राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या उत्थानासाठी आयुष्यभर संघर्ष केला. समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांना शिक्षण, सन्मान, समान संधी आणि न्याय मिळावा यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. डॉ आंबेडकर यांचे विचार समताधिष्ठीत भारताच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज येथे केले.




डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ८१ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होताना राज्यपाल बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा आपल्याला समाजातील विषमता, जातीयवाद, उच्च-नीचतेची भावना तसेच स्त्री-पुरुष भेदभाव मिटवण्याचा संदेश देतो. समाजातील प्रत्येक व्यक्ती सक्षम आणि सशक्त व्हावी यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येकाला समान संधी आणि आत्मसन्मान देणारा भारत घडविणे हीच डॉ. आंबेडकरांना खरी आदरांजली ठरेल, असे राज्यपालांनी सांगितले.

समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केल्याने इतरांनाही उत्कृष्ट कार्य करण्याची तसेच राष्ट्र आणि समाजकार्याला वाहून घेण्याची प्रेरणा मिळते. अशा पुरस्कारांमुळे समाजात सकारात्मक विचार, परिश्रमाची वृत्ती आणि राष्ट्रसेवेची भावना अधिक दृढ होते असे राज्यपालांनी नमूद केले. 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत' या संकल्पना साकार करण्यासाठी तसेच भारताला जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकास सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटक विकासाच्या प्रवाहात सहभागी झाल्यास हे ध्येय सध्या होईल,असेही राज्यपालांनी सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ नीलम गोर्हे व उद्योजक पद्मश्री डॉ अशोक खाडे यांना सोसायटीतर्फे देण्यात येणारा 'भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

## रिपब्लिकन सेनेच्या जिल्हाध्यक्षांचा अभिमान : रमेश उबाळे

सातारा : येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध प्रश्नावर सुरू केलेले रिपब्लिकन सेनेचे आंदोलन आठवड्यानंतर प्रशासनाने सर्व मागण्या मान्य केल्याने संपले.जिल्हाध्यक्ष अक्षय कांबळे व जिल्हाध्यक्षा पुजाताई बनसोडे यांनी केलेल्या अखेरच्या दिवशी केलेले आक्रमक पण जीवघेणे केलेले लक्षवेधक आंदोलन निर्णायक ठरले. खरोखरच,त्यांचा आपणास अभिमान आहे.असे गौरवोद्गार पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रमेश उबाळे यांनी काढले.



रिपब्लिकन सेनेने प्रशासनाविरोधात अनोखे आंदोलन करत संताप व्यक्त केला. तारेवरची कसरत करून जमा केलेले असे पैसे भ्रष्ट अधिकाऱ्यांना देऊन त्यांच्या विरोधात निषेध नोंदविण्यात आला. आठवडाभरात विविध प्रकारची आंदोलने करूनही प्रशासनाने दखल घेतली नव्हती. भ्रष्ट अधिकाऱ्यांना त्यांच्या पगारात भागत नसल्यामुळे आम्ही तारेवरची कसरत करून जमा केलेले पैसे त्यांना देणार आहोत.असा उपरोधिक टोला उबाळे यांनी लगावला.अखेरच्या दिवशी

**आठवड्यानंतर आंदोलनाला यश मिळाले !**

जिल्हाध्यक्ष अक्षय कांबळे आणि महिला जिल्हाध्यक्षा पूजाताई बनसोडे आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिल्याप्रमाणे आक्रमकपणे फाशी घेण्यासाठी कांबळे मुख्य प्रवेशद्वारावर चढले तर बनसोडे यांनी अंगावर डिझेल ओतून काडीची पेटी मागत होत्या.या सर्व गदारोळात पोलिसांनी हस्तक्षेप केल्याने पुढील अनर्थ टळला.सात दिवस उपोषण करूनही प्रशासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केले होते. सरतेशेवटी उपजिल्हाधिकारी यांनी लेखी दिल्याने अखेर आंदोलन शमले.

## शिवाजी रसाळ यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड



औंध(वार्ताहर): नांदोशी ता.खटाव येथील शिवाजी यशवंत रसाळ यांची मुंबई पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नतीने निवड झाली आहे. पोलीस दलात ते तीस वर्षांहून अधिक काळ कार्यरत आहेत. पोलीस दलात केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल त्यांनी डी. जी. पदक ही देण्यात आले आहे. या निवडीबद्दल त्यांचे नांदोशीचे सरपंच संजय जाधव, सर्व सदस्य, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ✻ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware



सासवड चा संगमेश्वर बंधारा वाहू लागला –पुरंदरच्या सासवड परिसरात समाधानकारक पर्जन्यवृष्टी झाल्याने येथील ऐतिहासिक आशा संगमेश्वर मंदिरा लगतच्या बंधाऱ्यावरून वाहणाऱ्या पाण्याचे मनमोहक दृश्य (फोटो –विजयकुमार हरिश्चंद्रे )

## व्यावसायिक चालकांना मराठी बंधनकारक!

मुंबई : व्यावसायिक प्रवासी वाहनचालकांसाठी व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्याची अधिसूचना ८ जुलैपासून देण्यात आली आहे. या सूचनेची अंमलबजावणी १६ ऑगस्ट २०२६ पासून केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ४, २, ७८ आणि ८५ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत.

# विजयनगरमध्ये स्व.आनंदराव व प्रेमलाताई चव्हाण यांच्या स्मृतिदिनी अभिवादन

## विचारांचा आणि संस्कारांचा वारसा जपण्याचा संकल्प–मानसिंगराव पाटील



कराड(प्रतिनिधी): समाजकारण, शिक्षण आणि लोकसेवेचा आदर्श घालून देणारे स्व. आनंदराव चव्हाण (काका), स्व. प्रेमलाताई चव्हाण (काकी), तसेच स्व. रामचंद्र पाटील (दादा) यांच्या स्मृतिदिनानिमित्त विजयनगर येथील प्रेमलाकाकी माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. ८) कृतज्ञतापूर्वक अभिवादन कार्यक्रम पार पडला. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर स्वर्गीय आनंदराव चव्हाण, स्वर्गीय प्रेमलाताई चव्हाण आणि स्वर्गीय रामचंद्र पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून या थोर व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा गौरव केला. समाजाभिमुख दृष्टी, शिक्षणाविषयीची तळमळ, माणुसकीची जपणूक आणि मूल्याधिष्ठित जीवनाचा आदर्श या गुणांचा उल्लेख करत मान्यवरांनी त्यांच्या कार्यातून आजच्या पिढीला प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

यावेळी विजयनगरचे उपसरपंच मानसिंगराव पाटील यांनी, स्व. प्रेमलाताई चव्हाण यांच्या विचारांचा आणि संस्कारांचा वारसा जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे सांगितले. शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन या मूल्यांचा स्वीकार करून समाजासाठी कार्य करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. स्मृतिदिनाचे औचित्य साधून विद्यालय परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे राबविला.

कार्यक्रमास मलकापूरचे युवा उद्योजक रफिकशेठ इनामदार, उद्योजक आर.टी. स्वामी, विजयनगरच्या सरपंच सौ. अनिताताई संकपाळ, मुंढे गावचे माजी सरपंच आनंदराव जमाले, माजी सरपंच रमेश लवटे, विजयराव कदम, राजेंद्र कदम, माजी उपसरपंच विश्वासराव पाटील, प्रा. हनमंतराव कराळे, अशोकराव जमाले, विजयनगरचे माजी सरपंच संजय शीलवंत, युवा नेते प्रतापसिंह पाटील, गिरीश पाटील, ग्रामपंचायत सदस्य अभिजीत जाधव, सौ. रंजना जाधव, रामचंद्र जाधव, हिम्मतराव देसाई, विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाबळेश्वर, माथेरानमधील अनधिकृत बांधकामांची चौकशी-महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई : पुणे व कोकण विभागातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांतील शासकीय भाडेपट्टा जमिनींवर अटींचा भंग करून झालेल्या अनधिकृत बांधकामांची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली असून, महाबळेश्वर आणि माथेरान येथील इको–सेन्सिटिव्ह क्षेत्रातील नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच या जमिनी कोणत्याही परिस्थितीत वर्ग–१ (फ्री होल्ड) करण्यात येणार नाहीत, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना सांगितले.

मंत्री बावनकुळे म्हणाले या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नियुक्त करण्यात येणार असून, समितीचा अहवाल पुढील अधिवेशनात सादर केला जाईल. महाबळेश्वर येथील २६ भाडेपट्टा जमिनी ८ फेब्रुवारी २०२२ रोजी वर्ग–२ मधून वर्ग–१ करण्यात आल्या होत्या. या निर्णयामुळे पर्यावरणास धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती.

**अटींचा भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई**

कायदा व न्याय विभाग तसेच पर्यावरण विभागाने आक्षेप नोंदविल्यानंतर शासनाने या प्रकरणाचा आढावा घेत समिती स्थापन केली आणि संबंधित निर्णय रद्द केला असल्याचे महसूलमंत्र्यांनी सांगितले.

या प्रकरणासंदर्भात काही याचिका उच्च न्यायालयात प्रलंबित असून पुढील सुनावणी ४ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे. शासन न्यायालयात प्रभावीपणे आपली बाजू मांडून सार्वजनिक हित आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक ती भूमिका घेईल, असेही महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

# नोंदणी क्रमांक दर्शनी भागात लावावेत

सातारा : सातारा जिल्ह्यातील सर्व धर्मादाय स्वरूपाच्या नोंदणीकृत न्यासांच्या नोंदणी प्रमाणपत्रानुसार नावाचे फलक तसेच त्यांचा नोंदणी क्रमांक व सदर न्यासाचे सद्य स्थितीमधील नोंदणीकृत विश्वस्त व पदाधिकारी यांचे नावाचा फलक बहुतांश देवस्थानचे / न्यासाचे दर्शनी भागावर लावले जात नसलेचे निम्नस्वाक्षरीकार यांचे निदर्शनास आलेले आहे.

तरी जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत असलेल्या देवस्थान/ न्यास, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था मंदिराचे/ कार्यालयाचे दर्शनी भागावर व मुख्य नाव फलकावर नोंदणी प्रमाणपत्रानुसार असलेले न्यासाचे नाव, नोंदणी यांनी क्रमांक व सध्याच्या कालावधीचे मंजूर बदल अर्जानुसार विश्वस्त व पदाधिकारी यांची नावे नमुद करून तसे फलक लावणे बंधनकारक आहे. त्याप्रमाणे सर्व न्यास, विश्वस्त व पदाधिकारी यांनी त्याचे पालन करावे अन्यथा महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदीनुसार योग्य त्या वेळी योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे सहायक धर्मादाय आयुक्त एस.एस. मांजरेकर यांनी कळविण्यात आले आहे

# योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

सातारा : महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त व विकास महामंडळामार्फत थेट कर्ज योजना, बीजभांडवल योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा व महिला स्वयंसिध्दी व्याज परतावा योजना अशा एकूण ६ योजना राबविण्यात येत आहेत. या सर्व योजना पूर्णपणे ऑनलाईन स्वरुपाच्या असून इतर मागास प्रवर्गातील पात्र अर्जदारास नाव नोंदणीसाठी महामंडळाच्या www. msobcfdc.org पोर्टलवरुन आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत.

याबाबत अधिक माहितीकरिता जिल्हा कार्यालय, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी विंग, दुसरा माळा, खोली नं. ३. सर्व्हे नं. २२/अ, जुना एम आय डी सी रोड, बॉम्बे रेस्टॉरन्ट उड्डाण पुलाजवळ, सातारा दुरध्वनी क्रमांक ०२१६२–२९५१८४ या पत्यावर साधावा संपर्क, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक पी.एन. दळवी यांनी केले आहे.

# जिल्ह्यात सरासरी ३७.२ मि.मी. पाऊस

सातारा : जिल्ह्यात ९ जुलै रोजी सरासरी ३७.२ मि.मी. पावसाची नोंद झाली असून आतापर्यंत एकूण सरासरी २७५.५ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.

तालुका निहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. सर्व आकडे मि.मी.मध्ये असून कंसातील आकडे आतापर्यंतच्या एकूण पावसाचे आहेत. सातारा –३३.३ (२३४.१ ), जावली–मेढा – ४७.७ (६५१.६), पाटण – ९३.४ (३७०.५), कराड – ५९ (२१७.३), कोरेगाव – २१ (२०७.४), खटाव – वडूज – १७.३ (१०५.२), माण – दहिवडी – ४ (३०.८), फलटण – २.९ (७७.६), खंडाळा – ९.७ (२३२.४), वाई – २४.७ (३६२.३), महाबळेश्वर – ६७.७ (१२९८.३) या प्रमाणे पाऊस झाला आहे.

# पुरंदरच्या पश्चिम भागात ढगफुटी; पानवडी घाटातील रस्ता खचला

## रस्त्यावरून वाहणाऱ्या धबधब्याने पर्यटकांना भुरळ

पुरंदर (प्रतिनिधी): पुरंदर तालुक्याच्या पश्चिम भागात गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे गराडे धरणातील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. तर पुरंदरचे मिनी काश्मीर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पानवडी खोऱ्यात ढगफुटीसदृश पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. अतिवृष्टीमुळे पानवडीच्या नागमोडी घाटरस्त्याचा काही भाग खचला असून, रस्त्याच्या कडेला धरणाच्या साठ्यात कोसळणारा धबधबा पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरत आहे.



उंच डोंगरकड्यांवरून फेसाळत कोसळणाऱ्या धबधब्यांचे आणि हिरव्यागार दऱ्याखोऱ्यांचे मनोहारी दृश्य पाहण्यासाठी स्थानिकांसह इतर जिल्ह्यांतील पर्यटक मोठ्या संख्येने येथे येऊ लागले आहेत. काळदरी–पानवडी परिसरातील शेतांच्या बांधावरून आणि डोंगर उतारांवरून वाहणारे असंख्य छोटे–छोटे धबधबे या परिसराच्या सौंदर्यात भर घालत आहेत. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या या निसर्गरम्य भागाला पावसाळ्यात वेगळेच रूप प्राप्त झाले आहे.

पुरंदर तालुक्याचा काही भाग दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जात असला, तरी ऐतिहासिक किल्ले पुरंदरच्या पायथ्याशी असलेले पानवडी खोरे पावसाळ्यात हिरवाईने नटते. डोंगररांगा, जलाशय, नागमोडी घाटरस्ते आणि धबधबे यामुळे या परिसराचे नैसर्गिक सौंदर्य खुलून दिसते. त्यामुळे वर्षभर पर्यटकांची येथे वर्दळ असते, मात्र पावसाळ्यात या परिसराचे आकर्षण अधिकच वाढते. काळदरी आणि पानवडी ही डोंगराळ भागातील गावे असून, येथून धावणाऱ्या एसटीच्या 'लाल परी'चा हिरव्यागार डोंगररांगांमधून होणारा प्रवासही पर्यटकांसाठी संस्मरणीय अनुभव ठरत आहे. पूर्वी दुर्गम भाग असल्यामुळे विकास मर्यादित होता. मात्र, आता चांगले रस्ते, स्थानिक व्यावसायिकांनी उभारलेली लहान हॉटेल्स आणि पर्यटनासाठी उपलब्ध होत असलेल्या सुविधा यामुळे या भागाकडे पर्यटकांचा ओढा वाढत आहे. पुरंदर किल्ल्याच्या परिसरातील पानवडीला अधिकृत पर्यटनस्थळाचा दर्जा मिळावा, यासाठी ग्रामस्थ आणि स्थानिक लोकप्रतिनिधी प्रयत्नशील आहेत. कायमस्वरूपी जलनियोजन आणि पर्यटन सुविधांचा विकास झाल्यास 'पुरंदरचे महाबळेश्वर' अशी स्वतंत्र ओळख या परिसराला मिळू शकते, असा विश्वास स्थानिकांकडून व्यक्त केला जात आहे. दरम्यान, अतिवृष्टीमुळे घाटरस्त्याचा काही भाग खचल्याने वाहनचालकांनी आणि पर्यटकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पावसाळी पर्यटनाचा आनंद घेताना सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# रस्त्याकडील नाले बंद;पावसाचे पाणी शेतात शेतकऱ्यांचे नुकसान

उंब्रज(प्रतिनिधी): उंब्रज ते चरेगावदरम्यान पाटण–पंढरपूर राज्य मार्गाच्या विस्तारीकरणाचे काम काही ठिकाणी पूर्ण झाले असून काही ठिकाणी अद्याप सुरू आहे. मात्र, ज्या भागात रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे, त्या ठिकाणी पावसाळ्यापूर्वी रस्त्याच्या दुतर्फा असलेले नाले खुले करण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याचा फटका परिसरातील शेतकऱ्यांना बसला आहे.



मुसळधार पावसामुळे रस्त्यावरील पाणी थेट शेतांमध्ये शिरून पिकांसह शेतीमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.उंब्रज परिसरातील कळंत्रेवाडी मध्ये एका ठिकाणी पावसाचे पाणी घराजवळील शेतात शिरल्याने शेतकरी जगन्नाथ थोरात यांनी जनावरांसाठी साठवून ठेवलेल्या कडव्याच्या गंजीला पाणी लागले. तसेच शेणखताची साठवणूक केलेल्या उकिरड्यातही पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात शेणखत वाहून गेले.याशिवाय शेतकरी राजेंद्र थोरात यांच्या शेतातही पावसाचे पाणी साचल्याने अवघ्या दोन दिवसांपूर्वी पेरलेले सोयाबीन कुजून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून नुकसानभरपाईची मागणीही होत आहे.

रस्त्याकडील नाले वेळेत खुले केले असते तर पावसाचे पाणी शेतात शिरले नसते, अशी भावना परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ नाले मोकळे करून पाण्याचा निचरा सुरळीत करावा आणि भविष्यात होणारे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# ल.पा.उपविभाग पूर्वीच्या सातारा मुख्यालयात ठेवण्याची धरणग्रस्तांची मागणी

**(अजित जगताप)**

सातारा दि: वाई तालुक्यातील धोम व सातारा–जावळी तालुक्यातील कण्हेर धरणामुळे विस्थापित झालेल्या धरणग्रस्तांचे पुनर्वसन सातारा तालुक्यात झाले आहे. अनेक जण कराड कोरेगाव सातारा तालुक्यातील पुनर्वसित गावामध्ये स्थायिक झाले आहेत. अशावेळी धोम व कण्हेर प्रकल्पामुळे मूळ गावे व राहती घरे सोडून इतरांच्या हितासाठी संसारावर अक्षरशः नांगर फिरवून स्थलांतर स्वीकारले आहे . त्याच जागी लोकोपाठ बद्दल उपविभाग असावा अशी मागणी धरणग्रस्त संघटनेने केली आहे.




धरणग्रस्तांच्या त्यागानंतरही अनेक वर्षे उलटून गेली असली तरी पुनर्वसित गावठाणांतील अनेक मूलभूत प्रश्न आजही प्रलंबितआहेत. या प्रलंबित प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी सातारा हे मध्यवर्ती व सर्वांच्या दृष्टीने सोयीचे ठिकाण आहे. महत्वाची शासकीय कार्यालय ही साताऱ्यात आहे. त्यामुळे पुनर्वसित गावांतील नागरिकांना सातारा येथे ये–जा करणे तुलनेने सोयीचे पडते. परंतु, संबंधित कार्यालय वाई येथील कार्यालयास जोडले गेल्यास सर्वच पुनर्वसित गावांतील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होणार आहे.त्यामुळे आर्थिक, मानसिक व वेळेचा मोठा भार धरणग्रस्तांवर पडणार आहे . तसेच प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यास अधिक विलंब होण्याची शक्यता आहे.

धोम व कण्हेर प्रकल्पांतर्गत पुनर्वसित गावांचे पुनर्वसन कराड, कोरेगाव, सातारा व जावळी या तालुक्यांमध्ये झालेले आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त नागरिकांना कामानिमित्त वारंवार वाई येथे जाणे वाहतूक व लांबचा पल्ला असल्याने गैरसोयीचे ठरणार आहे. तसेच जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे मुख्यालयही सातारा येथे असल्याने सर्व संबंधित प्रशासकीय कामकाज साताऱ्यातूनच अधिक सुलभपणे पार पडते. त्यामुळे सर्व बाबींचा विचार करून लघु पाटबंधारे उपविभाग हा वाई विभागास न जोडता सातारा मुख्यालय असणाऱ्या पूर्वीच्या विभागामध्येच कायम ठेवण्यात यावा, अशी मागणी केली आहे. यावेळी ला धरणग्रस्त संघटनेचे मंगलदास गायकवाड, गणेश सणस, संजय शेलार, रुपेश सपकाळ, सदाशिव चोरट आणि अनिल सणस यांच्या शिष्टमंडळाने लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन दिले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत कोर्टी जिल्हा परिषद शाळेची उज्ज्वल कामगिरी

उंब्रज(प्रतिनिधी): शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखत कोर्टी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने यंदाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील तीन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवली असून शाळेचा एकूण निकाल ७५ टक्के लागला आहे. सलग दुसऱ्या वर्षीही तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरल्याने शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

यंदाच्या परीक्षेत गौरी दिलीप थोरात हिने २५४ गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. सर्वेश महेश मदने याने २५२ गुण, तर श्रीराज बजरंग थोरात याने २४२ गुण मिळवून शिष्यवृत्ती प्राप्त केली. तसेच प्रज्वल महादेव मदने याने २३६ गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामागे वर्गशिक्षिका सौ. रूपा जोशी यांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि विद्यार्थ्यांची मेहनत महत्त्वाची ठरली. मे महिन्यापासून नियमित अतिरिक्त वर्ग घेऊन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती



परीक्षेसाठी विशेष तयारी करून घेण्यात आली. शैक्षणिक उपक्रमांसोबतच पोवाडा, निबंध, वक्तृत्व आणि क्रीडा स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे.

या यशाबद्दल मुख्याध्यापिका सुनीता कांबळे यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच सुवर्णा शेजवळ, विजयकुमार देशमुख, सीमा भोसले, आशाताई काळभोर आणि सविता जाधव यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल यादव, शिक्षणप्रेमी विठ्ठल थोरात, समिती सदस्य, पालक व ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे स्वागत केले. यावेळी केंद्रप्रमुख सर्जे राव केंजळे, नवनियुक्त केंद्रप्रमुख सविता जाधव, विस्ताराधिकारी देशमाने तसेच गटशिक्षणाधिकारी बिपिन मोरे यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले. कोर्टी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीच्या जोरावर तालुक्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून या यशामुळे परिसरातून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सातारा जि.प.सभेला फक्त प्रिंट मीडियाला उपस्थित राहण्याची परवानगी

(अजित जगताप)

सातारा : सातारा जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १० जुलै रोजी दुपारी एक वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये संपन्न होत आहे. या सभेसाठी साताऱ्यातील फक्त प्रिंट मीडियाला उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. अशी माहिती सातारा जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांशी औपचारिक गप्पा मारताना दिली.

सातारा जिल्हा परिषदेची मागील सर्वसाधारण झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्या बाबत विचार करणे.सातारा जिल्हा परिषदेची मागील सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आलेल्या ठरावावर करण्यात आलेल्याकार्यवाहीचा आढावा घेणे. महाराष्ट्र शासनाकडून आलेले शासन निर्णय/परिपत्रके यांचे अवलोकन करणे.,जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या खोल्या निर्लेखन करणेस/ पाडण्यास जि.प.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणे .सातारा जिल्हा परिषदेची सन २०२६-२०२७ ची दैनंदिनी छापाई करता येणाऱ्या रक्कम रुपये १.०० लक्षचे खर्चास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बांधकाम विभाग दक्षिण अधिनस्त लेखाशिर्षक जि.प. प्राथमिक शाळांची विशेष दुरुस्ती करणे अंतर्गत मौजे विसापूर ता. खटाव जि. सातारा येथे जि. प. प्राथमिक शाळा नवीन आठ खोल्या बांधणेकामी प्राप्त दरानुसार ई-निविदा स्विकारणेस मान्यता देणे बाबत विचार करणे.भवानी पेठ सि.स.नं. २७० (पशुवैद्यकीय चिकित्सालय, राजवाडा) ही जागा(मालमत्ता) सातारा नगर परिषदेकडे हस्तांतरीत करणेबाबत. ग्रामपंचायत विभागाकडील जिल्हा परिषद



अधिनस्त तालुकानिहाय जीर्णझाल्याने व वापरास अयोग्य असल्याने मोडकळीस आलेल्या जुन्या इमारती व पाण्याच्या टाक्या निर्लेखित करण्या बाबत केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करुन मान्यता देण्याबाबत विचार करणे.

समाजकल्याण विभागाअंतर्गत जि. प. स्वनिधी पाच टक्के अंतर्गत विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना खर्च करण्याचा सभेत ठराव घेण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या या दुसऱ्या सभेसाठी सातारा जिल्हा परिषदेचे सर्व सदस्य व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. बांधकाम उत्तर विभागाअंतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या प्रशासकिय व निवासी इमारतींच्या देखभाल दुरुस्तीकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी

निधी वितरण करण्याबाबत व लेखाशीर्ष २०५९ ४५३१ ( योजनांतर्गत) निधी वितरीत झालेल्या कामांस प्रशासकिय मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेचा अनुषंगीक ठराव देणे. अशा १८ विषय तसेच अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळीचे विषयावर चर्चा होणार आहे. सातारा जिल्हा परिषद पदाधिकारी व साताऱ्यातील पत्रकारांमध्ये समन्वय साधण्यासाठी आज सातारा जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या सभागृहात औपचारिक बैठक झाली.

त्यावेळी सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष डॉक्टर प्रियाताई महेश शिंदे, उपाध्यक्ष राजू भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी या यशानी नागराजन, निलेश घुले, गावडे, शिक्षण व अर्थ समिती सभापती, कृषी सभापती व महिला बालकल्याण सभापती तसेच पत्रकार उपस्थित होते. सातारा जिल्हा परिषदेच्या कामकाजाबाबत पत्रकारांनी योग्य ती भूमिका घ्यावी. जिल्हा परिषदेचा नावलौकिक कायम ठेवण्यासाठी पदाधिकारी प्रयत्न करत आहेत. पत्रकारांनी साथ द्यावी अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. दरम्यान, शुक्रवार दिनांक १० जुलै रोजी दुपारी एक वाजता होणारी सातारा जिल्हा परिषदेची सर्वसाधारण बैठक ही खेळीमेळीच्या वातावरणात होणार आहे. त्यापूर्वी भाजपची पार्टी मीटिंग होईल .असा आत्मविश्वास भाजप नेत्यांनी व्यक्त केला आहे. सातारा जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेला फक्त प्रिंट मीडियाला परवानगी देण्यामागे वादग्रस्त मुद्दे युट्युबवर सातत्याने प्रसारित होत असल्याने हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले. सभेची माहिती देण्यासाठी जिल्हा परिषदेमध्ये पत्रकार परिषद होईल असे स्पष्ट केले.

**सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी डॉ. प्रियाताई महेश शिंदे यांची निवड झाल्यापासून आतापर्यंत त्यांचे पती आमदार महेश शिंदे हे कधीही अध्यक्षांच्या दालनात आले नव्हते. महिला सक्षम रित्या कामकाज करतात. त्यामुळे आता अनेक महिला सभापती यांनीही कामकाजाकडे स्वातंत्रीत्या लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. कार्यकर्ता म्हणून काही सभापतींचे पती यांना विकास कामांसाठी लोक भेटतात. लोकांची कामे होणे महत्त्वाचे आहे. समोर तुमच्या पतीचा कुठेही हस्तक्षेप होत नाही. स्वत: जिल्हा परिषद सभापती हे सभापती कामकाज कामकाज करतात. असा खुलासा केला आहे.**

# सातारासह सात जिल्ह्यांत खरीप पिकांसाठी प्रधानमंत्री फसल विमा योजना

## एचडीएफसी अर्गोकडे अंमलबजावणीची जबाबदारी

सातारा(प्रतिनिधी): महाराष्ट्रातील खरीप हंगाम २०२६ साठी प्रधानमंत्री फसल विमा योजनेच्या (पीएमएफबीवाय) अंमलबजावणीची जबाबदारी एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीकडे सोपविण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत अकोला, धुळे, हिंगोली, जळगाव, पुणे, सातारा आणि सोलापूर या सात जिल्ह्यांतील कर्जधारक तसेच बिगर कर्जधारक शेतकऱ्यांना अधिसूचित खरीप पिकांसाठी विमा संरक्षणाचा लाभ मिळणार आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत अधिसूचित करण्यात आलेल्या पिकांसाठी ही योजना लागू राहणार असून, नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पीक नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, पावसातील खंड, भूस्खलन, चक्रीवादळ, वादळ, गारपीट, पाण्याचा साचलेला प्रभाव, कीड व रोगांचा प्रादुर्भाव अशा विविध बाह्य जोखमींमुळे उत्पादनात घट झाल्यास शेतकऱ्यांना विमा भरपाई मिळणार आहे. पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी राज्य शासनाकडून अधिसूचित क्षेत्रांमध्ये क्रॉप कटिंग एक्सपेरिमेंट्स (सीसीई) राबविण्यात येणार आहेत. या प्रयोगांमधून प्राप्त होणाऱ्या उत्पादनाच्या आकडेवारीवरून अपेक्षित उत्पादनापेक्षा कमी उत्पादन झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित पात्र शेतकऱ्यांना विमा दाव्याची रक्कम अदा करण्यात येईल. प्रधानमंत्री फसल विमा योजना ही केवळ पिकाच्या वाढीच्या काळापुरती मर्यादित नसून पेरणीपूर्व जोखीम, उभी पिके, कापणीच्या टप्प्यातील जोखीम तसेच कापणीनंतरच्या ठरावीक कालावधीतील नैसर्गिक आपत्तींचाही समावेश या संरक्षणात करण्यात आला आहे. त्यामुळे पीक उत्पादनाच्या संपूर्ण चक्राला या योजनेद्वारे सुरक्षा कवच उपलब्ध होत आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित जिल्ह्यातील शेतकरी आपल्या बँकेशी, कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) अथवा एचडीएफसी अर्गोच्या अधिकृत प्रतिनिधींशी संपर्क साधू शकतात. तसेच शेतकरी स्वतः ही फार्मर्स प किंवा प्रधानमंत्री फसल विमा योजनेच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करू शकतात. कृषी विभागाच्या संकेतस्थळावर अधिसूचित पिके, विमा संरक्षणाचा कालावधी आणि इतर आवश्यक माहिती उपलब्ध करण्यात आली आहे.

कृषी तज्ज्ञांच्या मते, बदलत्या हवामानामुळे वाढलेल्या नैसर्गिक संकटांच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री फसल विमा योजना शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे संरक्षण कवच ठरत आहे. सातारासह संबंधित सात जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी नोंदणी करून विमा संरक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्पर्धा परीक्षेत अण्णासाहेब कल्याणी विद्यालयाचा राज्यभर डंका!

सातारा (अनिल वीर यांजकडून) : रयत शिक्षण संस्थेच्या येथील अण्णासाहेब कल्याणी विद्यालयाने इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा - २०२६ च्या अंतिम निकालात घवघवीत यश संपादन करत स्पर्धा परीक्षेतील गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. राज्य गुणवत्ता यादीतील मानांकनासह मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे विद्यालयाचा लौकिक अधिक उंचावला आहे.



इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाच्या आठ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. आर्या सचिन थोरवे हिने २९० गुणांसह राज्यात द्वितीय, रुचिरा रणजित भोईटे हिने २८६ गुणांसह राज्यात चतुर्थ, पियुषा रविराज निकम व वेदिका नितीन पोळ यांनी २८४ गुणांसह राज्यात सहावा, दिशा दिनेश ढेरे व मैत्रेयी राहुल पवार यांनी २८२ गुणांसह राज्यात आठवा, मधुश्री तानाजी तनपुरे हिने २७८ गुणांसह राज्यात दहावा तर सिया संकेत बगाडे हिने २७६ गुणांसह राज्यात बारावा क्रमांक मिळविला. याशिवाय, २९ विद्यार्थ्यांनी शहरी गुणवत्ता यादीत तर चव्हाण आराध्या सुहास हिने उत्तेजनार्थ गुणवत्ता यादीत स्थान मिळविले.

इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतही विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत सान्वी विक्रम मोरे हिने २७२ गुणांसह राज्यात १५ वा व जिल्ह्यात १० वा क्रमांक मिळवून राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. तसेच अंश्रुली चेतन तोडकर, सिद्धी सचिन सोळवंडे, ज्ञानदा विजय कापसे, अक्षरा दीपक बागडे, अमित संदीप माळी, विराज प्रविण खामकर, अन्वी अविनाश भोसले आणि हर्षाली राहुल जोशी यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली. अधिश्री समीर पवार हिने उत्तेजनार्थ गुणवत्ता यादीत स्थान मिळविले.या अभूतपूर्व यशामागे विद्यार्थ्यांची अथक मेहनत, पालकांचे भक्कम सहकार्य आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण व नियोजनबद्ध मार्गदर्शन आहे. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विभाग प्रमुख सौ. एम. ए. जाधव व सौ. के. एन. पोरे, गुरुकुल प्रमुख एस.एस.जाधव, पर्यवेक्षक यू.व्ही.घाडगे व सौ.एस.डी.घोरपडे, उपमुख्याध्यापक पी. एल. पाटील तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक व रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव (माध्यमिक विभाग) बी.एन.पवार व यश संपादन केलेल्या अध्यायनार्थीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.स्पर्धा परीक्षांतील सातत्यपूर्ण यशातून विद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आपली परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित केली असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयाची वाटचाल अधिक बळकट होत असल्याचे या निकालाने सिद्ध केले आहे.

# उपजिल्हा रूग्णालयासमोरील फुटपाथ अतिक्रमणाच्या विळख्यात

कराड(प्रतिनिधी): शहरातील उपजिल्हा रूग्णालयासमोरील मुख्य रस्त्यालगतचा पादचारी फुटपाथ अतिक्रमणामुळे पूर्णपणे नामशेष झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. हातगाड्या, फेरीवाले आणि विविध व्यावसायिकांनी फुटपाथ व्यापल्याने रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि विद्यार्थ्यांना वाहनांच्या वर्दळीच्या रस्त्यावरून चालत जावे लागत असून, त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

उपजिल्हा रूग्णालयात दररोज मोठ्या संख्येने रुग्ण ये-जा करतात. मात्र, पादचाऱ्यांसाठी राखीव असलेला फुटपाथ अतिक्रमणामुळे वापरण्यायोग्य राहिलेला नाही. परिणामी रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना रुग्णवाहिका, दुचाकी व चारचाकी वाहनांच्या सततच्या रहदारीतून मार्ग काढावा लागत असून, अपघाताची भीती कायम निर्माण झाली आहे.

**रुग्णांना जीव मुठीत धरून प्रवास; हातगाड्या व फेरीवाल्यांमुळे पादचाऱ्यांचा रस्ता बंद; तातडीने कारवाईची मागणी**

आपत्कालीन परिस्थितीत रुग्णालयात पोहोचणाऱ्या रुग्णांसाठी ही समस्या अधिकच गंभीर ठरत आहे. सुरक्षित पादचारी मार्गच बंद झाल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून रस्ता ओलांडावा लागत असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असल्याची भावना परिसरातील नागरिक व्यक्त करत आहेत. सार्वजनिक सुविधेसाठी उभारण्यात आलेला फुटपाथ अतिक्रमणामुळे निष्प्रभ ठरत असल्याने नगरपालिकेने तातडीने अतिक्रमण हटवून पादचाऱ्यांसाठी तो खुला करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

यासोबतच पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी नियमित तपासणी, कठोर कारवाई आणि कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याची मागणीही नागरिकांनी केली आहे.

# ग्राम सुरक्षा यंत्रणेचे प्रभावी सुरक्षा कवच

## एका फोनवर संपूर्ण गाव सतर्क; आग, चोरी, वन्य प्राण्यांचे हल्ले, आपत्तींसह तातडीच्या घटनांची माहिती

कराड (प्रतिनिधी): ग्रामीण भागात एखाद्या क्षणी आग लागणे, चोरी अथवा दरोड्याचा प्रयत्न, लहान मुले किंवा वयोवृद्ध व्यक्ती हरविणे, वाहन अथवा शेतीमालाची चोरी, वन्यप्राण्यांचा वावर किंवा अचानक उद्भवलेली नैसर्गिक आपत्ती अशा घटनांमध्ये वेळेवर माहिती मिळणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. अशा प्रसंगी काही मिनिटांचाही विलंब मोठे नुकसान घडवू शकतो. हीच गरज ओळखून कार्यान्वित करण्यात आलेली ग्राम सुरक्षा यंत्रणा आज सातारा जिल्ह्यातील अनेक गावांसाठी प्रभावी सुरक्षा कवच ठरत आहे.

या यंत्रणेच्या माध्यमातून संकटग्रस्त नागरिकाने नोंदणीकृत टोल-फ्री क्रमांकावर फोन केल्यानंतर त्याचा संदेश किंवा आवाज काही क्षणांतच त्या परिसरातील हजारो नोंदणीकृत नागरिकांच्या मोबाईलवर पोहोचतो. त्यामुळे ग्रामस्थ तत्काळ घटनास्थळी धाव घेतात, प्रशासनाला माहिती देतात आणि अनेक प्रसंगी मोठे नुकसान टाळण्यात यश मिळते.गेल्या काही वर्षांत सातारा जिल्ह्यात ग्राम सुरक्षा यंत्रणेचा प्रभावी वापर होत असून, आग, चोरी, हरवलेल्या व्यक्तींचा शोध, वनव्यांवर नियंत्रण आणि विविध आपत्कालीन घटनांमध्ये या प्रणालीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा, स्थानिक प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यातील समन्वयामुळे ही यंत्रणा अधिक सक्षम झाली आहे.ग्राम सुरक्षा यंत्रणा केवळ गुन्हे रोखण्यासाठीच मर्यादित नसून, ग्रामसभा, सरकारी योजनांची माहिती, लसीकरण, पाणीपुरवठा, शाळांच्या सूचना, राशन वितरण, घरपट्टी व पाणीपट्टी वसुली, सरकारी कार्यक्रम, महिलांच्या सुरक्षेसंदर्भातील सूचना, सर्पदंश, अपघात, अतिवृष्टी, महापूर, भूकंप, वन्यप्राण्यांचे हल्ले, पिसाळलेल्या कुत्र्यांचा उपद्रव, मदतकार्य अशा अनेक विषयांवर नागरिकांपर्यंत तातडीची माहिती पोहोचविण्यासाठीही या यंत्रणेचा प्रभावी वापर केला जात आहे.

ग्राम सुरक्षा यंत्रणा सुमारे १३ वर्षांपासून कार्यरत असून, भारतातील कोणत्याही भागातून १८००२७०३६०० या टोल-फ्री क्रमांकावरून नोंदणीकृत नागरिक आपत्कालीन संदेश प्रसारित करू शकतात. त्यामुळे काही क्षणांतच मोठ्या संख्येने ग्रामस्थांना सतर्क करणे शक्य होते. महाराष्ट्रात सध्या सात जिल्ह्यांमध्ये ही यंत्रणा कार्यरत असून, ४३८ पोलीस ठाणे, १४९ शासकीय कार्यालये, ६,८७० गावे आणि सुमारे ७० लाख नागरिक या व्यवस्थेशी जोडले गेले आहेत. राज्यभरात या प्रणालीचा आतापर्यंत तब्बल १ लाख ७० हजार वेळा वापर झाला आहे. सातारा जिल्ह्यात ३१ पोलीस ठाणे, २४ शासकीय कार्यालये आणि १,२४५ गावे या यंत्रणेशी जोडली गेली असून, ९ लाख ४ हजार १७० नागरिकांनी नोंदणी केली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत या प्रणालीचा ८ हजार १८१ वेळा वापर करण्यात आला आहे. याच प्रणालीच्या मदतीने मसूर, तळबीड, बोरगाव, लोणंद, वाई, वडूज, फलटण ग्रामीण, पाटण आणि शिरवळ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत आग विझविणे, चोरीचे प्रयत्न हाणून पाडणे, डी.पी. ट्रान्सफॉर्मर चोरी रोखणे तसेच हरवलेल्या वयोवृद्ध महिलेचा शोध घेणे अशा अनेक घटनांमध्ये ग्रामस्थांना यश मिळाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील आपत्कालीन व्यवस्थापनात ग्राम सुरक्षा यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे सिद्ध झाले आहे.

गावात ग्राम सुरक्षा यंत्रणा सुरू करण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्याकडून सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती समितीचे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांची बैठक घेऊन या प्रणालीचे प्रात्यक्षिक सादर केले जाते. त्यानंतर नागरिकांची नोंदणी करून गावाला या आपत्कालीन संपर्क व्यवस्थेशी जोडले जाते. ग्रामीण भागात वेगवान संवाद, लोकसहभाग आणि तत्पर प्रतिसाद यांचा प्रभावी संगम घडवून आणणारी ही यंत्रणा आज अनेक गावांसाठी विश्वासार्ह सुरक्षा कवच बनली आहे.

# पावसाने वाढवला डेंग्यूचा धोका

## साचलेल्या पाण्यात डासांची वाढ, आरोग्य विभागाचे सतर्कतेचे आवाहन, घराघरांत जनजागृती मोहीम सुरू

कराड : पावसाळ्याची जोरदार सुरुवात होताच डासांची उत्पत्ती वाढू लागल्याने डेंग्यूसह इतर डासजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून सातारा जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे ग्रामीण, तसेच शहरी भागातील अनेक ठिकाणी पाणी साचले असून, हीच ठिकाणे डासांच्या प्रजननासाठी पोषक ठरत आहेत. त्यामुळे डेंग्यूचा संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन आरोग्य विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.



डेंग्यू हा एडीस इजिप्ती जातीच्या डासांमुळे पसरणारा आजार असून, स्वच्छ व साचलेल्या पाण्यात हे डास मोठ्या प्रमाणावर वाढतात. घराच्या परिसरातील पाण्याच्या टाक्या, कुलर, फुलदाण्या, प्लास्टिकची भांडी, टाकाऊ टायर किंवा उघड्यावर पडलेल्या वस्तूंमध्ये पाणी साचल्यास डासांची उत्पत्ती वेगाने होते. त्यामुळे नागरिकांनी परिसर स्वच्छ ठेवणे आणि साचलेले पाणी त्वरित हटविणे हीच डेंग्यूपासून बचावाची सर्वात प्रभावी उपाययोजना असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. कराड शहरातही पावसामुळे काही भागांत नाल्यांमध्ये व मोकळ्या जागांवर पाणी साचत आहे. दुर्गंधीयुक्त परिसर, ओलसर जागा आणि स्वच्छतेचा अभाव असलेल्या भागांमध्ये डासांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने आरोग्य यंत्रणा विशेष दक्षता घेत आहे. डेंग्यू नियंत्रणासाठी नियमित सर्वेक्षण, जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही कराड शहरात आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांकडून घराघरांत जाऊन नागरिकांना डेंग्यू प्रतिबंधाबाबत माहिती दिली जात आहे. पल्स पोलिओ मोहिमेबरोबरच गृहभेटीद्वारे स्वच्छतेचे महत्त्व, पाणी साचू न देणे आणि डेंग्यूची लक्षणे ओळखून वेळेत उपचार घेण्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. नागरिकांनी स्वतःची, तसेच परिसराची स्वच्छता राखल्यास डेंग्यूचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकतो. ताप, अंगदुखी किंवा इतर संशयास्पद लक्षणे आढळल्यास कोणताही विलंब न करता तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

**घरातील, तसेच परिसरातील पाणी साचू देऊ नका. पाण्याची भांडी नियमित स्वच्छ करा. झोपताना मच्छरदाणीचा वापर करा आणि पूर्ण अंग झाकतील असे कपडे परिधान करा. ताप, अंगदुखी किंवा डेंग्यूची कोणतीही लक्षणे जाणवल्यास स्वत: औषधे न घेता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्या.**

**- डॉ. शीतल कुलकर्णी**
(वैद्यकीय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र, कराड)

**आरोग्य विभागाचा सतर्कतेचा इशारा**

सातारा जिल्ह्यात डेंग्यू नियंत्रणासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात असल्या, तरी नागरिकांच्या सक्रिय सहभागाशिवाय या आजारावर नियंत्रण मिळविणे शक्य नाही. त्यामुळे प्रत्येकाने घर व परिसर स्वच्छ ठेवून साचलेले पाणी त्वरित हटवावे, अशी सूचना आरोग्य विभागाने केली आहे.

# आंध्र प्रदेश पत्रकार संघटनेच्या राज्य सचिवपदी डॉ.नेमाला यांची नियुक्ती

विजयवाडा : ऑल इंडिया स्मॉल अँड मीडियम न्यूजपेपर्स फेडरेशन (नवी दिल्ली) संलग्न आंध्र प्रदेश जर्नालिस्ट्स युनियनच्या राज्य सचिवपदी विशाखापट्टणम येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. नेमाला हेमसुंदरराव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भातील नियुक्तीपत्र विजयवाडा येथील गांधीनगरमधील युनियन कार्यालयात आयोजित




बैठकीत राज्याध्यक्ष डॉ. काकुमानू वेंकट वेणू आणि मुख्य सचिव गादमशेट्टी शेखर बाबू यांच्या हस्ते डॉ. नेमाला हेमसुंदरराव यांना प्रदान करण्यात आले.

यावेळी डॉ. नेमाला यांनी आपल्या नियुक्तीबद्दल युनियनच्या राज्य नेतृत्वाचे आभार मानले. राज्यातील पत्रकारांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या निराकरणासाठी आपण पूर्ण क्षमतेने कार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.